महाराष्ट्र शासन
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर.
Vilasrao Deshmukh Government Medical College, Latur.
(Office of the Dean)
Phone No./Fax No. :- 02382-253017.
Website: vdgmclatur.org Email :- dean_gmchl@rediffmail.com

जा.क्र. विदेशावैमला/विशा/पी.जी./वरिष्ठ निवासी/जाहिरात/ ५५२९ /२०२४, दिनांक :- ०६/०७/२०२४.

# जाहिरात

शासन निर्णय क्र. एलईसी-४३२२/प्र.क्र.२०१/शिक्षण-३, दिनांक ०६.०१.२०२३ अन्वये या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर करीता खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे वरिष्ठ निवासी संवर्गातील रिक्त पदे निवड समितीमार्फत तात्पुरत्या स्वरुपात भरण्यासाठी बंधपत्रित अर्हताप्राप्त पात्र उमेदवाराकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यासाठी खालील विभागनिहाय वरिष्ठ निवासी पदांसाठी जाहिरात देण्यात येत आहे. अर्जाचा विहित नमुना कार्यालयीन वेळेत मिळेल. अर्ज करतेवेळी उमेदवार शासकीय / अशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांनी अर्ज विहित मार्गाने व विहित नमुन्यात सादर करावा. अन्यथा त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच या पुर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

शासन निर्णय क्र. बीसीसी २०२४/प्रक्र.७५/१६-क, दि. २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये वरिष्ठ निवासी रिक्त पदांचा तपशिल विभागानुसार खालीलप्रमाणे आहेत.

| Sr No | Subject | Vacant Post | S.C. | S.T. | V.J./ NT (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | SEBC | EWS | Open | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Anatomy** | **05** | 01 | - | - | - | 01 | - | - | 01 | 01 | - | 01 | **05** |
| 2 | **Physiology** | **03** | - | 01 | - | - | - | - | - | - | - | - | 02 | **03** |
| 3 | **Biochemistry** | **03** | 01 | - | - | - | - | - | - | 01 | 01 | - | - | **03** |
| 4 | **Pathology** | -- | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 5 | Microbiology | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 6 | **Pharmacology** | **04** | - | - | 01 | - | - | - | - | 01 | - | 01 | 01 | **04** |
| 7 | **FMT** | **03** | 01 | - | - | - | - | - | - | - | 01 | - | 01 | **03** |
| 8 | **PSM** | **03** | - | - | - | 01 | - | - | - | 01 | - | 01 | - | **03** |
| 9 | Gen Medicine | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 10 | **Pediatrics** | **03** | - | - | - | - | - | - | - | 01 | 01 | - | 01 | **03** |
| 11 | Psychiatry | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 12 | Skin & VD | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 13 | **Gen Surgery** | **01** | 01 | - | - | - | - | - | - | - | - | - | - | **01** |
| 14 | Orthopedics | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 15 | **Radio-Diagno** | **02** | - | 01 | - | - | - | - | - | - | - | - | 01 | **02** |
| 16 | **ENT** | **02** | - | - | - | - | - | - | - | 01 | 01 | - | - | **02** |
| 17 | Ophthalmology | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 18 | OBGY | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 19 | Anaesthesia | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 20 | TB & Chest | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 21 | **Emergency Med** | **02** | - | - | - | - | 01 | - | - | - | - | 01 | - | **02** |
| TOTAL | | **31** | **04** | **02** | **01** | **01** | **02** | - | - | - | **05** | **03** | **07** | **31** |

सदरील पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील असून फक्त १२० दिवसांच्या कालावधीसाठी भरण्यात येत आहेत. वरील जाहिरातीमधील पदाच्या संख्येत कमी/ अधिक करण्याचा तसेच निवड समितीमार्फत निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा नियुक्ती रद्द करण्याचे अथवा जाहिरात रद्द करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांना असतील.

उपरोक्त प्रमाणे वरिष्ठ निवासी पदाकरीता मागविण्यात येणा-या अर्जाचा विक्री व स्विकृतीचा कालावधी खालीलप्रमाणे नमुद केल्यानुसार राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्ज विक्रीचा दिनांक | दिनांक ०६.०७.२०२४ ते दिनांक ०९.०७.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत |
| २ | अर्ज स्वीकृतीचा दिनांक | दिनांक ०६.०७.२०२४ ते दिनांक १०.०७.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत |
| ३ | अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक | दिनांक १०.०७.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत |
| ४ | मुलाखतीचा दिनांक | दिनांक ११.०७.२०२४ दुपारी ०३.३० वाजता कॉलेज कॉन्सिल हॉल, अधिष्ठाता कार्यालय येथे |

**DEAN**
Vilasrao Deshmukh Government
Medical College, Latur

# *जाहिरातीच्या अटी व शर्ती*

१) **अर्ज मागविण्याबाबत :-**

जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथील वरिष्ठ निवासींची रिक्त पदे भरण्यासाठी या जाहिरातीव्दारे आवश्यक ती अर्हता / पात्रता धारण करणा-या उमेदवाराकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

२) **अर्हता / पात्रतेबाबत :-**

1. वरिष्ठ निवासी या पदासाठी उमेदवाराने संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण केलेला असला पाहिजे.
2. पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याची नांद उमेदवाराच्या महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलच्या अथवा इंडियन मेडीकल कौन्सिलच्या प्रमाणपत्रावर झालेली असावी.
3. अर्ज सादर करतेवेळी उमेदवाराने विहित अर्हता पात्रता धारण केलेली असली पाहिजे.

३) **वयोमर्यादा** :- वरिष्ठ निवासी पदाकरीता उमेदवार ४५ वर्षापेक्षा अधिक वयाचा नसावा.

४) **अंतिम दिनांक व वेळ** :- अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १०/०७/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत असेल.

५) **अर्ज सादर करण्याबाबत:-**

i. विहित नमुन्यात संपुर्णपणे व योग्य त-हेने भरलेले अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्रांसह साक्षांकित छायाप्रतिसह वर उल्लेख केलेल्या अंतिम दिनांकापूर्वी व वेळेपूर्वी आवक टपाल विभाग, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथे प्रत्यक्ष सादर करावेत. अपूर्ण भरलेले, प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती सोबत नसलेले अर्ज स्विकारले/विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ii. जे उमेदवार या अगोदरच या संस्थेत अन्यथा शासकीय / खाजगी सेवेत असतील त्यांनी त्यांचे विहित नमुन्यातील भरलेले अर्ज त्यांच्या विभागामार्फत/ संस्थेमार्फतच तसेच संबंधित विभागप्रमुखांच्या / संस्थाप्रमुखांच्या ना-हरकत प्रमाणपत्रासह या कार्यालयास अंतिम दिनांकापुर्वी सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी परस्पर या कार्यालयास अर्ज सादर केल्यास त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

iii. ज्या उमेदवारांनी या अगोदर म्हणजे जाहिरात प्रसिध्द होण्याअगोदर अर्ज सादर केलेले असतील त्यांनी विहित नमुन्यातील अर्ज अंतिम दिनांकापूर्वी या कार्यालयास आवश्यक त्या प्रमाणपत्रासह साक्षांकित छायाप्रतिसह पुन:श्च सादर करणे बंधनकारक राहील. विहीत नमुन्यात नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

६) **विहित नमुन्यातील अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज योग्य त-हेने व संपूर्ण भरल्यानंतर त्यासोबत पुढील कागदपत्रांच्या/ प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रति खालील अनुक्रमाप्रमाणे सादर करणे बंधनकारक आहे.

i. प्रथम, विदतीय, तृतीय वर्ष एमबीबीएस उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र
ii. एमबीबीएस प्रयत्नांचे प्रमाणपत्र (Attempt Certificate)
iii. पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र
iv. एमडी/एमएस प्रयत्नांचे प्रमाणपत्र (Attempt Certificate)
v. महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल /एमसीआय नोंदणी प्रमाणपत्र (MCI Registration)
vi. जन्म तारखेचे प्रमाणपत्र/ माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र.
vii. आधार कार्ड.
viii. अनुभवाचे प्रमाणपत्र
ix. एमसीआय रेकग्निशन सर्टिफिकेट.
x. आंतरवासिता पुर्णत्वाचे प्रमाणपत्र
xi. ना-हरकत प्रमाणपत्र (If Employed)
xii. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र.

जे उमेदवार खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस परिक्षा उत्तीर्ण झालेले असतील व बंधपत्रित उमेदवार म्हणून दावा करीत असतील त्यांनी ते शासनाची सेवा करण्यास बंधपत्रित असल्याचा पुराव म्हणून प्रवेशावेळी त्यांनी संबंधित महाविद्यालयात सादर केलेल्या बंधपत्राची साक्षांकित प्रत संबंधित महाविद्यालयाकडून ते शासकीय सेवा करण्यास बंधपत्रित असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. त्या शिवाय त्यांचा बंधपत्रित उमेदवार म्हणून विचार केला जाणार नाही, तसेच अशा उमेदवारानी नियुक्ती स्विकारुन मध्येच नोकरी सोडली तर त्यांना बंधपत्राच्या दंडाची रक्कम या कार्यालयास भरणा करावी लागेल याची नोंद घ्यावी.

७) **निवड प्रक्रियाबाबत :-**

स्थानिक निवड मंडळामार्फत उमेदवारांची त्यांच्या गुणवत्तेनुसार व उपलब्ध जागेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसांच्या कालावधीकरीता निवड केली जाईल.

८) **उमेदवाराच्या निवडीबाबत प्राधान्यक्रम:-**

i. महाराष्ट्रातील कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमडी/ एमएस अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या बंधपत्रित उमेदवारास निवडीमध्ये प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

ii. उपरोक्त निवडीनंतरही काही जागा शिल्लक राहिल्यास महाराष्ट्रातील कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमडी/ एमएस अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या अबंधपत्रित उमेदवारांचा निवडीसाठी विचार केला जाईल.

iii. उपरोक्त निवडी नंतरही काही जागा शिल्लक राहिल्यास महाराष्ट्रातील कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयातून एमडी/एमएस अभ्यासक्रम पुर्ण केलल्या उमेदवाराचा निवडीसाठी विचार केला जाईल.

९) **प्रतिक्षा यादीबाबत:-**

वरिष्ठ निवासी पदासाठी जाहिर करण्यात आलेल्या पदांपेक्षा अर्जदारांची संख्या जास्त असेल तर अशा ठिकाणी उर्वरीत उमेदवारांना प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात येईल.

**१०) इतर अटी व शर्ती:-**

i. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले नियम अठी शर्ती तसेच येथून पुढे अमलात येणारे नियम अटी शर्ती निवड झालेल्या उमेदवारांनवर बंधनकारक असतील.

ii. जे उमेदवार बंधपत्रित असतील त्यांनी बंधपत्रित सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे. नियुक्ती मिळाल्यास त्यांना मध्येच नियुक्ती सोडावयाची झाल्यास बंधपत्र दंडाची रक्कम भरावी लागेल. त्याशिवाय त्यांना कोणतेही प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

iii. उमेदवार विवाहित असल्यास त्यांना 2 पेक्षा अधिक अपत्ये नसावीत. (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.)

iv. ज्या उमेदवाराविरुद्ध निवासी पदावर किंवा अन्य पदावर कार्यरत असताना शिस्तभंगाची कार्यवाही झाली असेल व त्यांच्या सेवा समाप्त केल्या असतील अशा उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

**११) रुजू अहवाल सादर करण्याबाबत :-**

निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्या कामावर रुजू झाल्याचे अहवाल द्विप्रतीत या कार्यालयास सादर करावेत, अन्यथा त्यांचे वेतन व भत्ते काढण्यास विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**१२) जाहिरातीमधील मजकूरात बदल करण्याबाबत:-**

या जाहिरातीमधील कोणत्याही मजकुरात नियम अटी शर्ती पदसंख्या इत्यादी बाबीमध्ये केंव्हाही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांनी राखून ठेवले आहेत. तसेच एखादे पद भरणे अथवा रिक्त ठेवणे याबाबतचे अंतिम अधिकारही अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांना असतील

अधिष्ठाता,
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, लातूर.

प्रत :-

१) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, .............................
३) सर्व संबंधित प्राध्यापक व विभागप्रमुख, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर.
४) सुचना फलक, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर.
५) डॉ. लक्ष्मण सरकुंडे, वैद्यकीय अधिकारी यांनी डॉ. राजहर्ष हणमंते, सहयोगी प्राध्यापक, शरीरविकृतीशास्त्र विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निवासी यांच्या अर्जाची तपासणी करुन यादी तयार करावी व श्री. शिंदे जयेश, कनिष्ठ लिपिक यांनी सदर कामी संबंधितांस मदत करावी.